**आज दिनांक 23/07/2026 रोजी साक्षीदाराचा उलटतपास शपथेवर सुरू. द्वितीय पक्षातर्फे विधीज्ञ श्री. एस. एस. विद्वांस यांच्यामार्फत :**

16) माझे शिक्षण बि. कॉम. पुर्ण झालेले आहे. त्यावेळी आमच्या पतसंस्थेमध्ये अंदाजे 9 ते 10 कर्मचारी कार्यरत असतील. आमच्या संस्थेमध्ये 1 व्यवस्थापक, 3 वरिष्ठ लिपीक, 4 कनिष्ठ लिपीक, 2 शिपाई व 1 वॉचमन असे कर्मचारी होते. घटना घडली त्यावेळी आमच्या पतसंस्थेच्या इतर कोणत्याही ब्रँचेस नव्हत्या व आजही नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या पतसंस्थेचे हेड ऑफीस व ब्रँच ऑफीस हे एकच आहे.

17) आमच्या पतसंस्थेतील कामगारांसाठी कर्मचारी सेवा नियम बनवलेले आहेत. सदरचे सेवा नियम हे सहकार उपनिबंधक यांच्याकडून मंजूर करून घेतलेले आहेत. ज्यावेळी एखाद्या कर्मचा–याला नेमणूक दिली जाते त्यावेळी नियुक्तीपत्रामध्ये नियुक्तीपत्रासोबत सदरील सेवा नियम यांची प्रत दिली जाते. द्वितीय पक्ष ईंगळे यांना नियुक्तीपत्र दिले व त्यामध्ये सदर सेवा नियमांची प्रत होती किंवा कसे हे मी आता सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, द्वितीय पक्ष श्री. ईंगळे यांना संस्थेच्या वतीने निर्णय घेण्याचा अधिकार नव्हता. साक्षीदार सांगतात की, परंतु, त्यांना रोजच्या व्हाउचरवर सही करण्याचा अधिकार होता. हे म्हणणे खरे आहे की, व्हाउचरवर श्री. ईंगळे यांनी सही केली म्हणजे ते फायनल झाले असे नव्हते. साक्षीदाराला नि. क्र. सी–25 वरील दस्त दाखवला. हे म्हणणे खरे आहे की, तो दस्त म्हणजे नोव्हेंबर 2016 ते मार्च 2017 या कालावधीचे मस्टर रोल आहे. हे म्हणणे खरे आहे की, नि. क्र. सी–25 कडील मस्टरमध्ये श्री. ईंगळे यांच्या नावासमोर पुर्ण अनुपस्थिती लावलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, नि. सी–25 मध्ये नमूद संपुर्ण कालावधीमध्ये श्री. ईंगळे हे कामावर हजर झालेले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, दि. 17/11/2016 रोजी संस्थेने स्वतः त्या दिवसापासून श्री. ईंगळे यांना कामावर येवू नये असे सांगितले होते. साक्षीदाराला नि. क्र. यु–4 कडील अ.क्र. 4 कडील दि. 17/11/2016 रोजीचे संस्थेने संतोष ईंगळे यांना दिलेले पत्र दाखवले. साक्षीदाराने सदरचे पत्र त्यांच्या संस्थेने दिले असल्याचे सांगितले व मान्य केले. सबब, त्यास **नि.क्र. यु–6** देण्यात येत आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदरच्या नि.क्र. यु–6 कडील पत्रानुसार संस्थेने श्री. ईंगळे यांना

कामावर येण्यास मज्जाव केला होता. दि. 17/11/2016 नंतर श्री. ईंगळे यांनी कामावर हजर राहण्याचा कधीही प्रयत्न केला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, नोव्हेंबर 2016 ते मार्च 2017 या कालावधीमध्ये श्री. ईंगळे हे गैरहजर असल्याने त्यांना त्या कालवधीचा पगार देखील दिलेला नव्हता.

18) आमच्या संस्थेने ईंगळे यांना दिलेले दि. 24/03/2017 रोजी दिलेले आरोपपत्र मी वाचलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्यामध्ये श्री. ईंगळे यांच्यावरअसा आरोप होता की, त्यांनी स्वतःच्या दुचाकीच्या कर्जाचे कागदपत्र कर्ज न फेडता परिवहन कार्यालयाकडे बेबाकी करण्यासाठी पाठवले. साक्षीदाराला नि क्र. सी–28 कडील दस्त दाखवला. हे म्हणणे खरे नाही की, नि. सी–28 कडील पत्र हे संस्थेने आरटीओ कार्यालयाला लिहलेले पत्र आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरटीओ कार्यालयाने संस्थेला पत्र दिलेले होते. हे म्हणणे खरे आहे की, त्यानंतर संस्थेने पुन्हा आरटीओ कार्यालयाला पत्र दिले होते. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या संस्थेकडून आरटीओ कार्यालयाकडे श्री. संतोष ईंगळे यांचे कर्ज बेबाक झाल्याचे पत्र कधीही गेलेले नाही. साक्षीदाराला नि.क्र. सी–29 ते सी–32 कडील दस्त दाखवले. सदरील नि.क्र. सी–29 ते सी–32 कडील कागदपत्र संस्थेने आरटीओ कार्यालयाला पाठविली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, नि. क्र. सी–29 ते सी–32 मधील फॉर्म क्र. 28 पासून पुढे पान क्र. 36 पर्यंत सर्व फॉर्म रिकामे आहेत व शेवटी केवळ सही आहे. सदरील नि. क्र. सी–30 ते सी–32 या फॉर्म वर शेवटी असणा–या सहया श्री. ईंगळे यांच्या आहेत. साक्षीदाराला नि.क्र. सी–29 कडील फॉर्म क्र. 35 दाखवला. त्यावरील शिक्का हा आमच्या संस्थेचा नाही. नि.क्र. सी–30 ते सी–32 वरील संतोष ईंगळे यांच्या सहया माझे समक्ष त्यांनी केलेल्या नाहीत. मी त्यांच्या सहया ओळखतो व त्याआधारे ठामपणे त्या त्यांच्या सहया आहेत असे सांगितले आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी फॉर्म क्र. 35 नि.क्र. सी–29 वरील सहया या कोणाच्या सहया आहेत हे मी सांगू शकत नाही. साक्षीदार सांगतात की, या सहया कोणाच्या आहेत ते मी सांगू शकत नसलो तरी नि.क्र. सी–29 वरील सहया या संतोष ईंगळे यांनी केलेल्या आहेत असे मला वाटते. साक्षीदाराला नि.क्र. सी–33 कडील दस्त दाखवला. हे म्हणणे खरे आहे की, ते आमच्या संस्थेने आरटीओ कार्यालयाला दिलेले दि. 23/02/2017 रोजीचे पत्र आहे. हे म्हणणे खरे आहे की, दि.

23/02/2017 रोजी आमच्या संस्थेला माहिती होते की, संतोष ईंगळे यांचे दुचाकी कर्ज बेबाकी करण्याचा प्रयत्न झालेला आहे. साक्षीदाराला नि.क्र. सी–22 कडील खाते उतारा दाखवला. हे म्हणणे खरे आहे की, सदरच्या खाते उता–यानुसार दि. 27/02/2017 रोजी श्री. संतोष ईंगळे यांच्या कर्ज खात्यामध्ये त्यांची उर्वरीत कर्जाची संपुर्ण रक्कम रोख स्वरूपात जमा करण्यात आलेली आहे व कर्ज खाते बंद करण्यात आले आहे. हे म्हणणे खरे आहे की, कागदपत्रावरून असे दिसते की, दि. 27/02/2017 रोजी कर्ज खाते बंद करण्याच्या पुर्वी अंदाजे एक ते दिड महिना आधी सदरचे कर्जाबाबत बेबाकी प्रमाणपत्र देण्याचा प्रयत्न झाला होता.

19) ज्या ज्या वेळी आम्ही कर्जाचे बेबाकी प्रमाणपत्र व इतर फॉर्म आरटीओ कार्यालयाला पाठवतो त्यावेळी आरटीओ कार्यालय त्याबाबत माहिती विचारत असू शकते. हे म्हणणे खरे आहे की, पतसंस्थेने अशा प्रकार पुन्हा आरटीओ कार्यालयाला सर्व बेबाकी व इतर प्रमाणपत्र बरोबर आहेत असे दुसरे पत्र पाठवल्यानंतर सदर कर्जाचा बोजा उतरवला जातो. सन 2017 च्या दरम्यान आमच्या संस्थेने एकूण किती जणांना 2 व्हिलर अथवा 4 व्हिलरची कर्जे दिलेली असतील हे मी आता सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरटीओ कार्यालयाकडून आमच्या पतसंस्थेला दि. 21/02/2017 रोजी बेबाकी प्रमाणपत्राबाबत पडताळणीसाठी पत्र आले होते. हे म्हणणे खरे आहे की, दि. 21/02/2017 रोजी आरटीओ कार्यालयाचे अशा स्वरूपाचे पत्र आलेले असताना देखील आम्ही दि. 27/02/2017 रोजी श्री. ईंगळे यांच्या कर्ज खात्यामध्ये कर्जाची रक्कम भरून घेतली. श्री. ईंगळे यांनी कर्जाची रक्कम भरल्यानंतर त्यांच्या वाहनावरील बोजा कधी उतरवण्यात आला हे मला सांगता येणार नाही. श्री. ईंगळे यांनी बेबाकी प्रमाणपत्र पाठवले व बोजा उतरवण्याचा प्रयत्न केला व तसेच फॉर्मवर सहया केल्या याबाबत आमच्या संस्थेने पोलिसांकडे तक्रार करण्याचा प्रयत्न केला नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझे शपथपत्रातील परिच्छेद क्र. 7 मध्ये माझे असे म्हणणे आहे की, कागदपत्रावर श्री. ईंगळे यांनी श्री. हेमंत विनायकराव गो–हे यांच्या खोटया सहया केल्या. श्री. गो–हे यांच्या सुटट्ीचा कालावधी अंदाजे दि. 08/12/2016 ते दि. 08/02/2017 पर्यंत असू शकतो. श्री. गो–हे यांना सदरील सुटट्ीचा कालावधी सोडून त्यापुर्वी व त्यानंतर देखील अशा प्रकारे कागदपत्रांवर सहया करण्याचे अधिकार होते.

माझे शपथपत्रातील परिच्छेद क्र. 8 मध्ये नमूद केल्याप्रमाणे श्री. ईंगळे यांनी संस्थेचा बोगस शिक्का बनवला याबाबत देखील संस्थेने कोणतीही पोलिस तक्रार दाखल केलेली नाही. श्री. गो–हे यांची बोगस सही वापरली गेली याबाबत श्री. गो–हे यांनी संस्थेकडे अथवा बाहेर कोठेही तक्रार केलेली नाही. दि. 27/02/2017 रोजी श्री. ईंगळे यांच्या खात्यात रक्कम भरली जाईपर्यंत आरटीओ कार्यालयाकडे कर्जाची बेबाकी झालेली नव्हती. याच कालावधीमध्ये आरटीओ कार्यालयाकडून इतर कोणत्या प्रकरणात अशा प्रकारे बेबाकी करण्याचा प्रयत्न झाल्याची कागदपत्रे संस्थेकडे आली किंवा कसे हे मला सांगता येणार नाही. हे मी सांगू शकत नाही की, सदरच्या संपुर्ण कालावधीमध्ये श्री. संतोष ईंगळे हे स्वतः कधीही संस्थेच्या कार्यालयात आलेले नाहीत. श्री. संतोष ईंगळे यांच्या कर्ज खात्यातील भरण्यात आलेली रोख रक्कम कोणी भरली हे मला सांगता येणार नाही. त्याबाबतची कागदपत्रे मी चौकशीच्या अनुषंगाने पाहिलेली नाहीत.

20) श्री. संतोष ईंगळे हे आमच्या संस्थेतील सुमंगल विभाग ज्यामध्ये एजंट लोक पैसे जमा करतात ते काउंटर लिपीक म्हणून सांभाळत होते. श्री. ईंगळे यांनी संस्थेचे चेक घेणे, पैसे हाताळणे अशी कामे केलेली आहेत. त्यांना कदाचीत लोन अकाउंटमध्ये पैसे जमा करण्याची माहिती असू शकते. श्री. ईंगळे हे नोकरीवर असताना त्यांचे कामावर देखरेख करण्याचे काम व्यवस्थापक हे करत होते. व्यवस्थापकांच्या गैरहजेरीत माझेकडे अशा प्रकारे देखरेखीचा अधिकार होता. हे म्हणणे खरे आहे की, या संपुर्ण प्रकरणामध्ये दि. 27/02/2017 रोजी संपुर्ण कर्जाची बाकी रक्कम भरण्यात आल्याने संस्थेचे आर्थिक नुकसान झालेले नाही. साक्षीदार सांगतात की, परंतु, संस्थेच्या नाव लौकिकास धक्का लागलेला आहे. संस्थेचा कर्मचारी अशा प्रकारचे काम करत असल्याने संस्थेच्या नावाला धक्का लागला असे माझे म्हणणे आहे. संस्थेच्या नावाला गालबोट लागले अशा प्रकारची कोणतीही लेखी तक्रार मला मिळाली नाही. माझेसमोर संचालक मंडळामध्ये सदर प्रकाराबाबत चर्चा झाली होती.

21) श्री. संतोष ईंगळे यांचे वडील या संस्थेचे फाउंडर संचालक होते तसेच, त्यांनी संस्थेचे उपाध्यक्ष पद व नंतर अध्यक्ष पद देखील भुषवलेले आहे. या घटनेच्या आधी संतोष ईंगळे यांचे वडील यांचा निवडणुकीत पराभव झाला होता किंवा कसे हे मी आता सांगू शकत नाही. या प्रकरणातील घटनेसंदर्भात श्री. संतोष ईंगळे यांच्या

व्यतिरिक्त इतर कोणत्याही कर्मचा–यावर संस्थेतर्फे कारवाई करण्यात आली नव्हती. या घटनेच्या आधी किंवा नंतर इतर कोणावर कारवाई झाली किंवा कसे हे मी सांगू शकत नाही. श्री. कमल किशोर पारेख नावाचे आमचे कर्मचारी होते त्यांच्यावर एक कारवाई करण्यात आली होती. त्यांच्यावर काय आरोप होता हे मला माहिती नाही. त्यांनी न्यायालयात दाखल केलेल्या केसचा काय निकाल लागला याची माहिती मला नाही.

22) हे म्हणणे खरे नाही की, मी कोणतेही आरोप श्री. ईंगळे यांच्या विरूध्द सिध्द करू शकलेलो नाही व त्याबाबतची कोणतीही कागदपत्रे दाखल केलेली नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही श्री. ईंगळे यांना आरोपपत्र देवून कामावरून कमी करणे हे पुर्णपणे बेकायदेशीर आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी दाखल केलेले शपथपत्र तसेच, संस्थेने श्री. ईंगळे यांना दिलेले आरोपपत्र हे पुर्णपणे खोटे आहे.

उलटतपास : पुर्ण.

फेरतपास : काही नाही.

**श्रवणोत्तर स्विकृत,**

Digitally signed by SONAWANE RAHUL ISHWER
Date: 2026.07.23 13:00:11 +0530

**(रा. ई. सोनवणे)**
न्यायाधीश,
कामगार न्यायालय क्र. 1 औरंगाबाद

दिनांक–23/07/2026